# श्री ग्रंथराज दासबोध अध्ययन



श्री. विजय.म. गाडगीळ.
‘अवधूत’ प्लॉट नं.४३२,सेक्टर२५,
निगडी,प्राधीकरण,पुणे ४४
फोन नंबर : ०२० २७६५६६६६

सौ. यशस्विनी. मु. केंदूरकर
श्रीसमर्थ हौसिंग सोसायटी,
धन्वंतरी सभागृहामागे, पुणे ४११००४

**( २०१४ नोव्हेंबर महिन्यातील स्वाध्याय )**

अभ्यासार्थी बंधू/भगीनीनो,

या स्वाध्यायाबरोबरच दा.प्रबोधच्या अभ्यासार्थींचा प.दा.अ. चा अभ्यास पूर्ण हणार आहे परंतू दा.प्रवेश व दा.परिचय च्या अभ्यासार्थींचा अभ्यास मात्र पुढे चालू राहणार आहे.त्या निमित्ताने सर्वांचेच मन:पूर्वक अभिनंदन.

**दा.प्रवेश :** ( द.२०-१० विमल ब्रह्मनिरूपण )

मानवी जीवनाचे अंतिम ध्येय परब्रह्म, म्हणजेच सच्चिदानंद स्थितीची प्राप्ती हेच आहे.व ते प्राप्त करण्यातच जीवनाची सार्थकता आहे.संतानी स्वत: अनुभव घेऊन ते साध्य करण्याचा मार्ग इतराना दाखविण्याचा सतत प्रयत्न केला आहे. आता ही परब्रह्म आवस्था साधायची कशी ? याचेच मार्गदर्शन श्री.समर्थानी दासबोधातील २० दशकात केले आहे. परब्रह्म अनिर्वचनीय असल्याने त्याचे वर्णन करणे अत्यंत कठिण जरी असले तरी देखील श्री.समर्थानी अत्यंत सोप्या पध्दतीने त्याची ओळख करून देण्याचा प्रयत्न दासबोध ग्रंथातील या अखेरच्या समासात केला आहे. ते म्हणतात की ‘ परी तो आहे एकदेसी । दृष्टांत न घडे वस्तुसी । कांही एक चमत्कारासी । देऊनी पाहिले । ’

- परब्रह्म चहूकडे पसरलेले आहे.
- ते कोठे नाही असे ठिकाणच नाही.
- त्याला धरता येत नाही व टाकताही येत नाही,
- ते मिळविण्यासाठी कष्टत जावे लागत नाही तर आहे त्या ठिकाणीच प्राप्त होऊ शकते.
- ते साधूंचे, संतांचे नव्हे तर सर्वांचेच विश्रांती स्थान आहे.
- कल्पनेने ते जाणता येत नाही कारण ते कल्पनेच्या पलीकडे आहे.

श्री. समर्थ म्हणतात की मायेचा निरास केल्याने म्हणजेच नित्य आणि अनित्य यातील भेद जाणून अनित्याचा त्याग व नित्याचा संग केल्याने हे परब्रह्म अंतरामध्ये बिंबते. यालाच साधना असे म्हणतात. एकदा का परब्रह्म अंतरामध्ये बिंबले की साधना संपते व साधनाचा त्याग होतो.

श्री.समर्थ म्हणतात की

‘‘ सकळ करणे जगदीशाचें । आणी कवित्वचि काय मानुशाचें । ऐशा अप्रमाण बोलण्याचें । काये घ्यावे ।।

दासबोध ग्रंथासारखा महान ग्रंथ लिहूनही श्री.समर्थानी ग्रंथ लेखनाचे श्रेय स्वत:कडे मुळीसुध्दा घेतलेले नाही हे येथे लक्षात घेण्यासारखे आहे. ते म्हणतात की .‘‘ प्रभू रामचंद्राने हा ग्रंथ माझेकडून लिहून घेण्याची कृपा केली आहे ’’ त्याच्या कृपेविना हे शक्य नाही.

या समासातील शेवटच्या १२ ओव्या दैनंदिन दासबोध वाचनानंतर म्हणण्याचा परिपाठ समर्थ संप्रदायात आहे.

**दा.परिचय :** ( द.९ - ४ जाणपण निरूपण )

‘‘ प्रयत्नपूर्वक व योग्य दिशेने सद्गुणांची जोपासना व दुर्गुणांचा त्याग केला तरच भाग्य प्राप्त होते. व जाणतेपणाने,ज्ञानाने युक्त असे कर्म केल्यास व उत्तम गुणांचा विकास केल्यास उत्तम फलाची प्राप्ती होते. व हे केवळ मानव देहातच शक्य आहे ’’

ही या समासाची मध्यवर्ती कल्पना आहे. नीट न जाणता, अजाणतेपणे निव्वळ कर्मकांड करणे, हे मोक्षप्राप्तीसाठी उपयुक्त होत नाही हे या समासात निक्षून सांगण्यात आले आहे. ‘‘ न जाणता कोटीवरी । साधनें केली परोपरी । तरी मोक्षास अधिकारी । होणार नाही ।।९-४-२८ ।। असे श्री.समर्थ निक्षून सांगतात.

गेल्या दोन वर्षांतील दासबोध अभ्यासामुळे आपला स्वभाव आणी  वर्तन या मध्ये काही फरक झाल्याचे आपणास जाणवते का? आपण या पूर्वी कसे वागत होतो व आता कसे वागतो याचा स्वत:च विचार करावा व प्र.५ चे प्रांजळ उत्तर लिहावे.

**दा. प्रबोध :**    **१)**  विसाव्या दशकातील ४,५ व ८  या तीन समासांचा अभ्यास या महिन्यात करावयाचा आहे.
**अ)** द.२०-४ ( आत्मा निरूपण ) : भगवंताला जाणावयासाठी काय करावे याचे सोपे मार्गदर्शन या समासात आढळते. श्री.समर्थ म्हणतात ‘‘  पृथ्वी मध्यें जितुकीं शरीरें । तितुकीं भगवंताची घरे । नाना सुखें येणे द्वारें । प्राप्त होती ।। २०-४-४ ।। प्रत्येक व्यक्तिमात्रात एकच एक असे , व नित्य असलेले काय आहे ? याा शोध घेताना असे लक्षात येते की सर्वांमधे असलेली चैतन्य शक्ती एकच आहे व ती म्हणजेच ‘‘ सत्, चित्, आनंद’’ भगवंत होय.ते एकच एक आत्मतत्व  सर्वत्र भरून राहिलेले आहे. अंतर्देव निरूपण हा समास परिचय स्तरालाही आपण अभ्यासिला आहे त्यामुळे या समासाचा अर्थ लागणे सोपे जावे. या विश्वातील सर्व घडामोडी ईश्वरी सत्तेने कशा चालतात याचे विवरण  श्री.समर्थानी या समासात समर्पकपणे केले आहे.ते वाचून आपला अहंभाव कमी होण्यास मदत होऊ शक्ते.
**ब)** द.२०-५ (चत्वारजिनसनिरूपण) : या सृष्टीमधे जे नीरनिराळ्या प्रकारचे जीव आहेत त्यात मानव हा अत्यंत विषेश आहे. मानव देह ही ईश्वराची एक अद्भुत निर्मिती आहे.मानव देह मिळणे हे फार दुरापास्त आहे ,कठिण आहे, व दुर्लभ आहे.याच देहात राहूनच केवळ  भगवंत प्राप्ती शक्य होते. श्री.समर्थ पुढे म्हणतात ‘‘नरदेह परम दुल्लभ । येणे घडे अलभ्य लाभ । दुल्लभ ते सुल्लभ । होत आहे ।। २०-५-२५ ।। ईश्वराने जी विवेक नामक शक्ती आपल्याला बहाल केलेली आहे या शक्तीमुळेच माणूस परमात्म्याला जाणू शकतो व आपले जीवन सफल करू शकतो, हित साधू शकतो. श्री. समर्थ म्हणतात,त्या परमात्म्याला ज्याने ओळखले नाही त्याचे जिणे व्यर्थ होय.‘‘ येथें जेणें आळस केला । तो सर्वस्वें बुडाला । देव नाहीं वोळखिला । विवेकबळे ।। २७ ।। देहाचे विषेशत्व संगणारा हा समास आहे.
**क)**   द.२०-८  (देहक्षेत्रनिरूपण) : द.२०-५ मधे  चर्चिलेला विचारच याही समासात अत्यंत सुस्पष्टपणे मांडला आहे.  श्री.समर्थ सांगतात की ‘‘अस्तीमांशाचे शरीर । त्यामध्यें गुणप्रकार । शरीरासारिखें यंत्र । आणिक नाही ।। २०-८-११ ।।’’ भगवंताने या मानवी शरीरालाच केवळ सर्व स्वातंत्र्य बहाल केले आहे. काय करावे,काय करू नये. काय खावे, काय खावू नये. कसे असावे, कसे असू नये. आपले जीवन उद्दिष्ट काय आहे ? हे मानव स्वत: ठरवू शकतो, समजू शकतो, निर्णय घेऊ शकतो हे या देहाचे वैशिष्ठ्य आहे.ईश्वर प्राप्ती सारखे अद्भुत साध्य या मानवी देहाने शक्य होऊ शकते. असे अद्भूत कार्य करणारे मानवी शरीर खरोखरच एक अद्वितीय ईश्वर निर्मिती आहे. या शरीरासारिखें यंत्र । आणिक नाही,  हा ।। २०-८-११ ।। याओवीचा उत्तरार्ध  प.दा.अ. उपक्रमातील ६ प्रमुख पायाभूत संबोधांपैकी एक आहे.

******